|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव

## NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON

Grade –B (2.88)
(NAAC RE- ACCREDITED)

P.B.NO. 80, UMAVI NAGAR, JALGAON – 425 001 (M.S.)

जा.क्र.उमवि/५/टे.क्र.०३/४४६/२०१२ दिनांक: ३१/०५/२०१२

प्रति,
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी
संलग्नीत असलेल्या सर्व अशासकीय
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयांचे
मा.प्राचार्य ............

विषय:- अशासकीय कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रत्येक विषयाकरिता किमान विद्यार्थी संख्येबाबत पाळावयाच्या निकषाबाबत........

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यांत येते की, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा आयोजनाबाबत मा.परीक्षा मंडळाने ठराव क्र.प.मं.२६/२०१२ अन्वये खालीलप्रमाणे शिफारस केली होती.

**ठराव क्र.प.मं.२६/२०१२**

अशासकीय कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील तुकड्या मंजूर करतांना त्या महाविद्यालयाने विद्यार्थी संख्येबाबत पाळावयाचा निकष महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवा योजना विभागाने शासन निर्णय क्रमांक एनजीसी-१०९३/(५९१८)/मशि-३, दिनांक १९ जून, १९९५ अन्वये प्रसिध्द केलेले आहे. पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रत्येक विषयाकरिता किमान विद्यार्थी संख्या १६ ठरवून दिलेली आहे. सदरची प्रवेशक्षमता लक्षात घेऊनच पदव्युत्तर अभ्यासक्रमांना विद्यापीठ संलग्नता विभागाने संलग्नता द्यावी. किमान विद्यार्थी संख्येपेक्षा अत्यल्प प्रवेश असल्यास संलग्नता देऊ नये. सदरचा निकष हा विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागांनाही लागू राहील. सदरची शिफारस मा.विद्या परिषदेकडे मान्यतेसाठी पाठवावी, असे ठरले.

मा.परीक्षा मंडळाने उपरोक्त ठरावान्वये मा.विद्या परिषदेस केलेली शिफारस मा.विद्या परिषदेच्या विचारार्थ सादर करण्यांत आली असता मा. विद्या परिषदेने ठराव क्रमांक वि.प.ए-०६/२०१२, दिनांक २८.०२.२०१२ अन्वये सदरची शिफारस मान्य केलेली आहे.

उपरोक्त ठरावांच्या अनुषंगाने पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रत्येक विषयाकरिता किमान विद्यार्थी संख्या १६ ठरवून देण्यांत आली आहे. सदरची प्रवेशक्षमता विचारात घेऊन यापुढे पदव्युत्तर अभ्यासक्रमांना विद्यापीठामार्फत संलग्नता देण्यांत येणार असून किमान विद्यार्थी संख्येपेक्षा अत्यल्प प्रवेश असल्यास विद्यापीठामार्फत संलग्नता देण्यांत येणार नाही.

तरी आपणांस कळविण्यांत येते की, उपरोक्त ठरावांची नोंद घेऊन पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांना प्रवेश देते वेळी प्रत्येक विषयाकरिता किमान १६ विद्यार्थी संख्येबाबत नमूद केलेली अट कृपया कटाक्षाने पाळावी, ही विनंती. तसेच विद्यापीठास संलग्नतेचा प्रस्ताव सादर करतांना त्यात विद्यार्थी संख्येचा आवर्जुन उल्लेख करावा. आपणांस असेही विदीत करण्यांत येते की, सदर अभ्यासक्रमांस किमान विद्यार्थी संख्येपेक्षा अत्यल्प प्रवेश असल्यास विद्यापीठामार्फत कोणत्याही सबबीवर त्यास संलग्नता देण्यांत येणार नाही.

म.कळावे,

आपला विश्वासू,
सही/xxx
(स.भा.सुरवाडे)
उपकुलसचिव
महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ

<u>प्रत माहितीसाठी:-</u>
विद्यापीठाचे सर्व शैक्षणिक विभाग.